अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई–३०
दुरध्वनी क्र.– ०२२–२४९२१२१२, २४९२२६१८
Email - addlcpacbmumbai@mahapolice.gov.in

दिनांक :– १३/०९/२०२४

## –: प्रेसनोट :–

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | बृहन्मुंबई विभाग. |
| गुन्हा नोंद क्रमांक | २८/२०२४. |
| कलम | कलम ७ भ.प्र. अधिनियम १९८८. |
| आरोपी लोकसेवक | श्री. मंगेश नामदेव रक्ष, ४२ वर्षे, पो.शि.क्र. ०६२९८,<br>काशीगाव पोलीस ठाणे, मिरा भाईंदर वसई विरार आयुक्तालय, ठाणे |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. १०,०००/- |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रु. ३,०००/- गुगल पे द्वारे, रु. ७,०००/- लाच स्विकारण्याचा प्रयत्न |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार हे वाहन चालक म्हणून काम करतात. दिनांक ११/०९/२०२४ रोजी कामानिमित्त कल्याण येथे गेले होते. कामावरुन परत येत असताना काशीमिरा या ठिकाणी त्यांची गाडी बंद पडली म्हणून त्यांनी नमूद गाडी पार्किंग लाईट लावून रस्त्याच्या कडेला लावली होती. लोकसेवक यांनी त्यांची बाईक तक्रारदार यांच्या गाडीला पाठीमागून येवून ठोकली. नमूद अपघातात लोकसेवक यांना दुखापत झाली व त्यांनी तक्रारदार यांच्याशी हुज्जत घालण्यास सुरवात केली. तक्रारदार यांनी त्यावेळी १०० नंबर वर नियंत्रण कक्षास कॉल केला असता, सदरठिकाणी काहीवेळातच स्थानिक पोलीस आले व त्यांना पोलीस ठाणेस घेवून गेले. लोकसेवकदेखील थोड्यावेळाने वैद्यकीय उपचार घेवून पोलीस ठाणेस परत आले. नमूदवेळी लोकसेवक यांनी तक्रारदार यांचे लायसन्स स्वतःच्या ताब्यात घेतले व त्यांच्याविरुध्द कायदेशीर कारवाई न करण्याकरीता तसेच लायसन्स परत करण्याकरीता रु. १०,०००/- लाचेची मागणी केली. नमूदवेळी तक्रारदार यांनी त्यांचे बँक खात्यात फक्त रु. ३,५००/- असल्याचे सांगितले. त्यानुसार लोकसेवक यांनी त्यांच्या ओळखीच्या खाजगी पान टपरीवरील इसमाच्या मोबाईल क्रमांकावर तक्रारदार यांना रु. ३,०००/- गुगल पे करण्यास भाग पाडून लायसन्स परत करण्याकरीता उर्वरीत रु. ७,०००/- उद्या दिनांक १२/०९/२०२४ रोजी घेवून येण्यास सांगितले. परंतु तक्रारदार यांना लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक. १२/०९/२०२४ रोजी लाप्रवि, वरळी, मुंबई कार्यालयास समक्ष येवून लेखी तक्रार दिली.<br><br>नमूद तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १२/०९/२०२४ रोजी पंचासमक्ष करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे रु. ७,०००/- इतक्या रक्कमेची लाच स्वरूपात मागणी करुन ती स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार तात्काळ करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक यांना संशय आल्याने त्यांनी तक्रारदार यांचे शर्टाच्या खिश्याची तपासणी करीत असताना त्यांच्या हातास लाचेची रक्कम व व्हाईस रेकॉर्ड लागल्याने त्यांनी तक्रारदार यांच्याशी हुज्जत घालून झटापटी करण्यास सुरवात केली असता त्यांना ताब्यात घेण्यात आले. म्हणून त्यांच्या विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

सापळा अधिकारी :- श्री. अविनाश गायकवाड, पो.नि.

पर्यवेक्षक अधिकारी :- श्री रविंद्र बाबर, सहाय्यक पोलीस आयुक्त

मार्गदर्शन अधिकारी :- श्री. संदीप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. अनिल तुकाराम घेरडीकर, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. राजेंद्र सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

( मनिषा झेंडे )
सहाय्यक पोलीस आयुक्त, (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अथवा लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क : लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.
टोलफ्री क्र. १०६४, दुरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८
वेबसाईट :– acbmaharashtra.gov.in, ईमेल :– acbwebmail@mahapolice.gov.in
ईमेल :– addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
फेसबुक :– www.facebook.com - Maharashtra ACB
मोबाईल ॲप :– www.acbmaharashtra.net